# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 16 May 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक १६ मे २०२६ दुपारी १.०० वा.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच 'सीबीएसई'ने इयत्ता बारावीच्या निकालांनंतरच्या प्रक्रियेबाबत एक अधिसूचना जारी केली आहे. आपल्या गुणांवर असमाधानी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाने दोन टप्प्यांची पडताळणी प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात, विद्यार्थी त्यांच्या उत्तरपत्रिकांची स्कॅन केलेली प्रत ऑनलाइन मिळवू शकतात. तर दुसऱ्या टप्प्यात, विद्यार्थी गुणांची पडताळणी किंवा विशिष्ट उत्तरांच्या पुनर्मूल्यांकनासाठी विनंती करू शकतात. उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतीसाठी विद्यार्थ्यांना या महिन्याच्या १९ ते २२ तारखेपर्यंत प्रति विषय ७०० रुपये शुल्क भरून ऑनलाइन अर्ज करता येईल. तर गुणांच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी २६ ते २९ मे दरम्यान अर्ज सादर करता येतील, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.

****

आज आंतरराष्ट्रीय प्रकाश दिन साजरा होत आहे. भौतिकशास्त्रज्ञ आणि अभियंता थिओडोर मैमन यांनी १९६० मध्ये लेझरचा पहिला यशस्वी प्रयोग केला होता, त्यांच्या  स्मरणार्थ दरवर्षी १६ मे रोजी हा दिवस साजरा केला जातो. या वर्षीची संकल्पना "शाश्वत भविष्यासाठी प्रकाश" ही आहे. प्रकाशाच्या अभ्यासाने पर्यायी ऊर्जा स्रोत, जीवनरक्षक वैद्यकीय निदान साधने आणि उपचार, उच्च-गती दळणवळण तंत्रज्ञान आणि समाजात परिवर्तन घडवून आणणाऱ्या तसंच विश्वाविषयीची समज अधिक सखोल करणाऱ्या असंख्य शोधांमध्ये प्रगती साधली आहे. या निमित्ताने, युनेस्कोने वैज्ञानिक सहकार्य अधिक दृढ करण्याचं आणि शांतता आणि शाश्वत विकासासाठी प्रकाशाच्या शक्तीचा उपयोग करण्याचे आवाहन केलं आहे.

****

१६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन पाळला जातो. केंद्र शासनाने यंदाही आजचा हा राष्ट्रीय डेंग्यू दिन" राज्यात सर्वत्र साजरा करण्याविषयी आदेशीत केलं आहे. यासंदर्भातल्या मार्गदर्शक सूचनांनुसार डेंग्यू विषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांमध्ये नागरिकांचाही सक्रिय सहभाग असणार आहे.

****

आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी नागपूर इथल्या आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर मोठं आंदोलन सुरू आहे. सरकारी योजना आणि सुविधांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी कालपासून धरणे आंदोलन सुरू केलं असून, संपूर्ण रात्र त्यांनी कार्यालयासमोरच ठिय्या देत काढली. राज्यभरात आदिवासी विकास विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या सरकारी वसतिगृह योजना आणि शैक्षणिक सहाय्य योजनांचा उद्देश आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शिक्षण शुल्क तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणं हा असला तरी या योजना केवळ कागदावरच मर्यादित राहिल्या असून प्रत्यक्षात अनेक सुविधांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा या आंदोलक विद्यार्थ्यांचा आरोप आहे. आपल्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी प्रशासनाला दिला आहे.

****

गडचिरोली मधल्या चार्मोशी तालुक्यातील रामसागर इथं कृषी विभागाच्या भरारी पथकाने धाड टाकून संशयित अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांसह ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल काल जप्त केला. जप्त केलेल्या बियाण्यांमध्ये पुष्पा, बलवान तसंच मालामाल या वाणांच्या बियाण्यांचा समावेश आहे. या प्रकरणी देवेंद्र सदाशिव वन्नेवार यांच्या विरोधात चामोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची आणि तुरळक पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील तर विदर्भात हवामान कोरडं असेल आणि तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

****

आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेमध्ये युवा भारतीय मुष्टियोद्ध्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे, दोन सुवर्ण पदकांसह सात रौप्य पदकांना या खेळाडूंनी गवसणी घातली.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज आज कोलकाता इथं कोलकाता नाईट रायडर्सचा सामना गुजरात टायटन्स सोबत सायंकाळी साडेसात वाजता होणार आहे.

****

बॅडमिंटनमध्ये, भारतीय पुरुष दुहेरीची जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी थायलंड ओपनच्या उपांत्य फेरीत मलेशियाच्या नूर इझुद्दीन आणि गोह सी फेई या जोडीचा पराभव केला आहे.

****

बुखारेस्ट इथं सुपर चेस क्लासिकच्या दुसऱ्या फेरीत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने विश्व चॅम्पियनशिप चॅलेंजर झवोखीर सिंदारोव्हवला उत्कृष्ट डावपेचांचं प्रदर्शन करत पराभूत केलं. दुसऱ्या फेरीनंतर, प्रज्ञानंद, केमर आणि वाशियर-लाग्रेव्ह प्रत्येकी दीड गुणांसह पहिल्या स्थानावर बरोबरीत आहेत.

****